# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

बुधवार, दिनांक ९ मार्च, २०२२/ फाल्गुन १८, १९४३ (शके)

४७. **सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे वितरण**

विधानपरिषदेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसची टोकन्स **मा.सदस्यांना शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी हजेरीपटावर स्वाक्षरी करतांना व तद्नंतर सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजीपासून सत्र संपेपर्यंत "ड-३" (अंदाज समिती), कक्ष क्र.१२०२, बारावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे देण्यात येतील. सन्मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील वितरणाच्या ठिकाणी जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांना वितरीत करण्यात येतील.

| अ.क. (१) | वार व दिनांक (२) | अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेले पेनड्राईव्ह सुटकेससह वितरणाचा कालावधी (३) | वितरणाचे ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ | अर्थसंकल्पावरील मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवन करीता आरक्षित असणाऱ्या वाहनपार्किंगच्या मोकळ्या जागेवर, RT-PCR चाचणी केंद्रामध्ये (मंडपामध्ये) विधान भवन, मुंबई. |
| २. | सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ पासून सत्र संपेपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | कक्ष क्रमांक ११०४ (क) (अकरावा मजला), विधान भवन, मुंबई. |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्याव्यात.

मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ मार्च, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य ( मंत्री व राज्यमंत्री महोदयांसह )
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.